## श्री.एस.एस.फडके, अपर जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कार्यालय यवतमाळ

रामाक्र९१ /एनएपी-३४/२००८-०९
मौजा वडगांव रोड ता.जि.यवतमाळ

आवेदक :- विदर्भ प्रिमीअर को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लि.नागपूर तर्फे अध्यक्ष
श्री.रविंद्र देविदास दुरगकर रा.नागपूर

### आ दे श
(पारीत दिनांक १८/८/२००९)

मौजा वडगांवरोड ता.जि.यवतमाळ येथील स.नं.१२/२ अ चे ले-आऊट मधिल भूखंड क्र.१ ते ४ व १७ ते ३६ एकुण क्षेत्रफळ ४२८७.५० चौ.मि. या भूखंडाची निवासोपयोगी कामाकरीता भूखंड विभाजनाची परवानगी मिळणेबाबत विदर्भ प्रिमीअर को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लि.नागपूर तर्फे अध्यक्ष श्री.रविंद्र देविदास दुरगकर रा.नागपूर यांनी उपविभागीय अधिकारी यवतमाळ यांचेकडे दि.१८.५.२००९ रोजी सर्व आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केला त्यावरुन उपविभागीय अधिकारी यवतमाळ यांचेकडून सर्व संबंधित विभागाचे अभिप्रायासह प्रकरण या कार्यालयास मंजुरीकरीता प्राप्त झाले.

प्रकरणात उपविभागीय अधिकारी यवतमाळ यांचे पत्र क्रमांक/प्रस्तु क्र.१/उविअ/कावि/१६२२ /२००९ दिनांक १९.५.०९ नुसार सर्व संबंधित विभागाचे अभिप्राय मार्गाविण्यात आले असून पत्र क्रमांक/प्रस्तु क्र.१/उविअ/कावि/१६२१/२००९ दिनांक १९.५.०९ नुसार जाहीरणामा प्रसिध्द करुन हितसंबंधी असणा-या लोकांचे आक्षेप दि.८.६.०९ पर्यत लेखी स्वरुपात सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले होते. सदर भूखंड विभाजनास संमती असल्याबाबत सदर भूखंड मालकांनी १००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेले आहे

१) प्रकरणात सहाय्यक संचालक नगर रचना यवतमाळ यांनी त्यांचे पत्र जा.क्र.भूखंड विभाजन/ स.क्र.१२/२अ/ससंय/८५८ दिनांक ६.६.२००९ नुसार अभिप्राय सादर केला. त्यानुसार मौजा वडगांवरोड ता.यवतमाळ येथील स.नं.१२/२ अ चे ले-आऊट मधिल भूखंड क्र.१ ते ४ व १७ ते ३६ चे विभाजनास खालील अटींवर मंजुरीची शिफारस करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

१) सदर भूखंडाचा वापर ब आणि क वर्ग नगर परिषदेला लागु असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार निवासी क्षेत्रात अनुज्ञेय असलेल्या बांधकामाकरीताच करण्यात यावा.

२) सदर भूखंडावर बांधकाम करतांना ब आणि क वर्ग नगर परिषदेला लागू असलेल्या बांधकाम उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

३) सदर भूखंडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यापूर्वी संबंधित नियोजन प्राधिकरण / ग्रामपंचायतची परवानगी घेणे आवश्यक राहील.

४) या कार्यालयाच्या पूर्व परवानगीशिवाय सदर भूखंडाचे विभाजन पुन्हा करता येणार नाही.

५) सदर भूखंड विभाजनामुळे आजुबाजूच्या भूखंडधारकाचे सुविधाधिकार बाधित होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) या कार्यालयाचे अभिप्राय हे नियोजनाच्या दृष्टीने देण्यात येत असून जागेच्या मालकी हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास ही शिफारस रद्द समजण्यात येईल.

७) सदर भूखंड विभाजनाच्या नकाशांना अपर जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी दिनांक २१.३.२००३ रोजी पारीत केलेल्या अकृषक आदेशामधिल सर्व अटी लागू राहतील.

२) उपविभागीय अधिकारी यवतमाळ यांनी त्यांचे पत्र क्रमांक/प्रस्तु क्र.१/उविअ/कावि/२२५४/२००९ दि.८.७.०९ नुसार स.नं.१२/२ अ चे ले-आऊट मधिल भूखंड क्र.१ ते ४ व १७ ते ३६ आवेदकास भूखंड विभाजनाची परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

३) तहसिलदार यवतमाळ यांनी त्यांचे पत्र क्रमांक/प्रस्तु-१/कावि/५२५/२००९ दिनांक १७.६.२००९ नुसार स.नं.१२/२ अ चे ले-आऊट मधिल भूखंड क्र.१ ते ४ व १७ ते ३६ नियमांची पुर्तता करुन विषयांकित प्लॉट विभाजन करण्याची परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

४) सरपंच ग्रामपंचायत वडगांव रोड यांनी त्यांचे पत्र दिनांक १५.६.०९ नुसार स.नं.१२/२ अ चे ले-आऊट मधिल भूखंड क्र.१ ते ४ व १७ ते ३६ निवासी कामाकरीता भूखंड विभाजनाची परवानगी देण्यास हरकत नसल्याचे